

# गुप्तहेर संपदा आणि पानचोर


अदिती देवधर

संपदाच्या इमारतीच्या आवारात एक मोठं वावळाचं झाड आहे. जवळजवळ साठ वर्षांचं झाड असेल ते. दोन्ही हात बाजूला पसरून खोडाला मिठी मारली तर चार मुलं लागतील एवढा खोडाचा घेर आहे.



कितीतरी पक्षी येतात त्या झाडावर. घार, कावळा, कोकिळा, साळुंकी, नाचण, राखी वटवट्या, शिंपी, लालबुड्या बुलबुल, शिपाई बुलबुल, टिकेल्स ब्लू फ्लायकॅचर.

झाडाला जानेवारी महिन्यात फळं येतात. फळ पापडीसारखं असतं आणि मधोमध बी असते.




त्या बिया धनेश आणि पोपटांना फारच आवडतात. सकाळी धनेशची जोडी तर संध्याकाळी पोपटांचा मोठा थवा ठाण मांडूनच बसलेला असतो. प्रचंड कलकलाट चालू असतो त्यांचा.

धनेश आणि पोपटांपासून प्रेरणा घेऊन एक पापडी सोलून, बी तळहातावर ठेवून कितीतरी वेळ संपदा निरखत होती. “कशी लागते ग? कडू तर नसेल ना?” संपदाने विचारलं.

“अगं एवढी घाबरतेस काय. आम्ही लहानपणी भरपूर खायचो ह्या बिया,” आई म्हणाली, “तुम्हाला ना सवयच नाही. कुठेही गेलं की आपले डबे घेऊन जाता किंवा मग ते पाकीटातले चिप्स. आम्ही हा असा रानमेवाच खायचो.” आई म्हणाली.


धाडस करून संपदाने बी तोंडात टाकली. आपण श्रीखंडात चारोळी घालतो ना, त्या चारोळीसारखी वावळाची बी दिसत होती आणि चवही साधारण तशीच होती.



लांबपर्यन्त बी पोहोचावी आणि नवीन वावळाची झाडं यावीत म्हणून झाडाने ही युक्ति केली आहे. बी पापडीमध्ये सुरक्षित असते. ही पापडी हलकी असल्याने वाऱ्याबरोबर उडत लांब लांब जाते. कुठेतरी मातीवर पडते, वरचं आवरण म्हणजे पापडी कुजून गेली की बी रुजते आणि वावळाचं नवीन झाड येतं. वाऱ्याच्या मदतीने झाड असं

एरवी वावळाचं हे झाड आजूबाजूच्या लोकांचा खूप लाडकं होतं. पण हिवाळा सुरु झाला की मात्र जरा गडबड व्हायची.

“झाली का कटकट सुरू” इमारतीचं आवार झाडणाऱ्या मावशी खराटा घेऊन, कमरेवर हात ठेवून वावळाकडे बघत उभ्या होत्या. ऑक्टोबर सुरू झाला की वावळाची पानं गळायला सुरुवात होते. एप्रिलपर्यंत असं चालूच राहतं. दर आठवड्याला हा एवढा ढीग तयार होतो.



“पानं कमी होती म्हणून की काय ह्या पापड्या. त्याचाही कचरा.” मावशींची चिडचिड सुरूच होती.

मावशीना सांगितलं होतं, आठवड्याचा ढीग झाला की मग जाळून टाकायचा.

“पानं काय कुजून जातील ना. जाळायची कशाला?” संपदाने आई-बाबांना सांगितलं. “एवढ्या पानांचं करणार काय ते सांग. जागा कुठे आहे आपल्याकडे. दर आठवड्याला हा एवढा ढीग जमतो. करणार काय?” हा दोघांचा प्रश्न.

संपदाने मग शेजारच्या काका-काकूंकडे प्रयत्न केला. “बरोबर आहे ग तुझं. पण ज्यांच्याकडे भरपूर जागा आहे त्यांचं ठीक आहे. आपण काय करणार”, तिच्या हातावर रव्याचा लाडू ठेवत काकू म्हणाल्या.

पानं जाळणं कसं चुकीचं आहे, त्याचे काय वाईट परिणाम होतात, हा सगळा अभ्यास संपदाने केला. पृथ्वीवरची जीवसृष्टी ही कार्बनपासून बनलेली आहे. त्यामुळे कुठलीही जैविक गोष्ट जाळली की त्यातला कार्बन आणि हवेतला ऑक्सीजन ह्यामुळे कार्बन डायऑक्साईड वायू तयार होतो. कधी कधी ढीग धुमसत राहतो. पुरेसा ऑक्सीजन मिळाला नाही तर कार्बन मोनॉक्साइड तयार होतो. कार्बन डायऑक्साईड आणि कार्बन मोनॉक्साइड दोन्ही ग्रीन हाऊस गॅसेस म्हणजे हरितगृह वायू आहेत. जागतिक तपमान वाढीत दोघांचा हातभार आहे.


कार्बन मोनॉक्साइड हा आपल्या आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत घातक वायू आहे. रक्तातल्या लाल पेशींची ऑक्सीजन वहन क्षमता हळूहळू तो कमी करतो. त्याला तर विषारी वायू म्हणतात.

अर्थात पानं जाळणं हे अपायकारक आहे ह्याबद्दल कोणाचाच दुमत नव्हतं. अगदी जागतिक तपमान वाढ, प्रदूषण ह्या कारणामुळे नाही तरी धूरामुळे डोळे चुरचुरणं, घसा बसणं असा त्रास तर सगळ्यांनाच होतो. पण दुसरा काही पर्याय नाही ह्यावर सगळे ठाम होते. ‘केवढा तो ढीग आहे, जळणार नाही तर करणार काय दुसरं’ हे वाक्य सतत त्यांच्या बोलण्यात येत होतं.

‘करणार काय’ हे तर संपदालाही माहित नव्हतं. पण ती जळणारी पानं काही तिला बघवत नव्हती.

विचार करता करता तिला एक कल्पना सुचली. घाईघाईने तिने बाल्कनीतलं स्टूल आणलं. स्वयंपाकघरातल्या माळ्यावर पोती होती. अर्थात स्टूलावर चढूनसुद्धा तिचा हात माळ्यावरच्या पोत्यांपर्यंत नीट पोहचत नव्हता. टाचा उंच करून, परत परत प्रयत्न केल्यावर पोती एकदाची हातात आली.

एक पोतं घेऊन ती अंगणात गेली. परवा मोठ्ठा ढीग जाळला होता. काल आणि आज गळलेली पानं होती. दातेरी फावड्याने पानं एके ठिकाणी तिने गोळा केली. मावशींच काम किती कष्टाचं आहे हे तिला जाणवलं.



ती पानं तिने पोत्यात भरली. गल्लीत एक रिकामी जागा होती. गवत आणि झुडपं तिथे वाढलेली असायची. त्या जागेत रस्त्याजवळ तिने भरलेलं पोतं ठेवलं. पानं आहेत म्हणल्यावर कोणी फारसा इंटरेस्ट दाखवणार नाही.



आता आई-बाबा, काका-काकू जाळतील कशी पानं, त्यांच्यापासून लपवूनच ठेवली होती ना तिने. एक खोडकर हसू संपदाच्या चेहऱ्यावर आलं. चला, निदान ही पानं तिने वाचवली. खूश होऊन ती घरी आली.

तिच्या मैत्रिणीला नेहाला तिने हे संगितलं. “चल, बघून येऊ पोतं आहे का,” नेहाने सुचवलं.

“अगं, पोतं असणारच. पानं कोण पळवणार आहे” असं संपदा म्हणाली खरी पण तिलाही उत्सुकता होतीच. दोघी त्या जागी पोहोचल्या आणि खरंच संपदाला वाटलं तसं पोतं जसंच्या तसं तिथे होतं.

दुसऱ्या दिवशी नेहा धापा टाकतच संपदाकडे आली. “संपदा, संपदा, पोत गायब झालंय”.

“काय” म्हणत संपदा बाहेर आली आणि दोघी त्या जागेजडे पळाल्या. खरंच, आज तिथे पोतं नव्हतं. “आता वाळलेली पानंही लोक चोरायला लागले”, संपदा म्हणाली.

पानांचा नक्की काय झाला कळलं नाही तरी पानं जाळली नव्हती कारण जवळपास कुठे धूर दिसत नव्हता, राख पडली नव्हती. खरोखरंच पानं चोरीला गेली की काय. हरकत नाही, चोर पानं जाळत नाहीये, मग ठीक आहे.

आता पुढचं पोतं भरून ह्या दोन दिवसांत पडलेली पानं सुरक्षित न्यायची होती. ह्यावेळी नेहाही मदतीला होती. त्यामुळे काम भराभर झालं. हे दुसरं पोतंही त्या जागी ठेवून दोघी परत आल्या.

पहिलं पोतं गायब झाल्याने आता काय होतंय ही उत्सुकता दोघींना होती.

नेहाच्या घराच्या बाल्कनीतून ती जागा दिसायची. बाल्कनीत चक्कर टाकून पोतं आहे ना हे नेहा दिवसभर बघत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी बघते तर काय पोतं गायब.


दोघी तिथे गेल्या. दुसरं पोत नुसतं गायब नव्हतं, तर त्या जागी पहिलं रिकामं पोतं ठेवलं होतं, तेही व्यवस्थित घडी करून.

हे काय? दोघी बघतच राहिल्या. ‘पानचोर भलताच किंवा भलतीच व्यवस्थित आहे. रिकामं पोतं परत केलं आणि तेसुद्धा नीट घडी करून.’

अर्थात विचार करत बसायला दोघींना वेळ नव्हता. पुढचं पोतं भरायचं काम होतं. अशीच चार पोती ठेवली आणि चारही गायब झाली. पाने गायब झाली, रिकामी पोती परत आली.

सस्पेन्स वाढतच होता. आता छडा लावायचाच असं दोघींनी ठरवलं.

पोतं ठेवून संपदा नेहाच्या घरी गेली. दोघी बाल्कनीत जाऊन बसल्या. ह्यावेळी दोघींनी जय्यत तयारी केली होती. पानचोराला नीट बघता यावं म्हणून दुर्बिण घेतली.



किती वेळ बसावं लागेल माहिती नव्हतं. पाण्याची बाटली, भूक लागली तर खायला लाडू, चकली आणि कंटाळा येईल म्हणून वाचायला पुस्तकं अशी तयार ठेवली होती. संपदा शेरलॉक होम्स वाचत होती तर नेहा फास्टर फेणे.

पंधरा मिनिटं दोघी अगदी डोळ्यात तेल घालून बघत होत्या. “पाळत ठेवणं फारच कंटाळवाणं काम आहे.” नेहा लाडवाचा तुकडा तोंडात टाकत म्हणाली. “हो ना, आणि किती वेळ पाळत ठेवून बसावं लागेल माहित नाही, पानचोर कधीही येऊ शकतो.” चकली खात संपदाने दुजोरा दिला.

सोळाव्या मिनिटाला दोघींनी आपापली पुस्तकं उघडली. पुस्तक वाचत, अधून मधून त्या पोत्यांकडे नजर टाकत होत्या.

शेरलोक होम्स ‘मसग्रेव्ह रिच्युअलचा’ अर्थ लावत होता. गणित वापरून त्याने कोडं जवळजवळ सोडवलंच होतं. गोष्ट फारच रंगत चालली होती. तर इकडे फास्टर फेणे प्रतापगडावर काय करतोय हे वाचण्यात नेहा गर्क झाली होती.

दोघी पुस्तकात गढून गेल्या. दारावरची बेल वाजली तेव्हा कुठे त्या भानावर आल्या. किती वेळ गेला होता कोण जाणे. दोघींनी एकदम पोत्याकडे नजर टाकली आणि काय पोतं गायब. अरे यार, तेवढ्यात पोतं नेलं.

दोघी पळत तिकडे गेल्या. परत तेच. पानांनी भरलेलं पोतं नेलं होतं आणि आधीचं रिकामं पोतं व्यवस्थित घडी करून ठेवलेलं होतं.

तीन दिवसांनी पोतं भरून दोघींनी परत तिथे ठेवलं. पण आज त्या पाळत ठेवणार नव्हत्या. खूप विचार केल्यावर त्यांना एक कल्पना सुचली होती. पाळत ठेवण्याच्या बोअर कामापेक्षा ही कल्पना फारच इंट्रेस्टिंग होती.

आता काय होतंय अशी उत्सुकता मनात ठेवून देऊन दोघी घरी गेल्या. सारखी चक्कर मारून पोतं आहे की नाही बघण्याची आता गरज नव्हती. त्यांचा प्लॅनच असा भारी होता.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे पोतं गायब होतं. पण त्यांचा प्लॅन यशस्वी झाला होता.

दोघींनी हाय-फाय केलं आणि पानांचा माग काढायला सुरुवात केली. पाळत ठेवण्याचा प्लॅन फसल्यावर दोघींनी खूप विचार केला. एवढी गुप्तहेरांची पुस्तकं वाचली होती की कल्पना भरपूरच होत्या. संपदाने कात्रीने पोत्याचा खाली थोडा भाग कापला. अगदी थोडा, साधरण एका पानाच्या आकाराचा.

पाने पोत्यात भरल्यावर संपदाने पोतं उचललं, नेहाने पोत्याच्या खाली भोकावर हात धरला. अशी ही मजेशीर जोडगळी त्यांच्या नेहमीच्या जागेवर पोहोचली. पोतं जमिनीवर ठेवल्यावर पानं पडण्याचा काही प्रश्न नव्हता. पण 'पानचोर' पोतं उचलून चालायला लागला की मात्र त्या भोकातून थोडी पाने पडत जाणार होती. आणि तसं झालंही. त्यांनी पोतं ठेवलं होतं त्या जागेपासून थोड्या थोड्या अंतरावर पानं पडली होती.

पानांचा माग काढत दोघी निघाल्या. पानांची रांग रस्ता सोडून एका इमारतीत शिरली. माग घेत दोघी रस्त्यावरून वळून त्या इमारतीच्या आवारात शिरल्या.

"ही वीणा मावशीची सोसायटी" संपदा म्हणाली.

"तुझ्या आईची मैत्रिण ना"

"हो!"

इमारतीच्या आवारातून दोघी जिन्याकडे वळल्या. पायरीवर पानं होती. त्या जिना चढायला निघाल्या. पहिला मजला गेला, पानांचा माग अजून संपला नव्हता. दुसरा, तिसरा आणि चौथा मजला गेला. शेवटी पाचवा मजला आला. हा मात्र शेवटचा मजला होता. त्यावर गच्ची होती. पाचवा मजला खाली टाकून दोघींनी गच्चीकडे जाणारा जिना चढायला सुरुवात केली.

पानांचा माग गच्चीतच गेला होता. गच्चीचं दार उघडं होतं. जावं की नाही असा विचार करत शेवटी दोघी त्या दारातून आत गेल्या.

आणि बघतच राहिल्या.

गच्ची कसली ते शेत होतं. इकडे टोमॅटोची रोपं तर तिकडे दोडक्याचा वेल, पलीकडे मेथीचा वाफा तर कोपऱ्यात शेवग्याचं झाड. संपूर्ण गच्ची पालेभाज्या, फळभाज्याच्या वाफ्यांनी भरून गेली होती. अंजीर, स्ट्रॉबेरीसुद्धा होती. भिंतीला लागून एक शेल्फ ठेवलं होतं. घमेलं, खुरपं आणि इतर बागकामाचं सामान त्यात होतं.

आणि

आणि

त्यांचं रिकामं पोतं तिथे नीट घडी करून ठेवलेलं होतं. दोघी बघतच राहिल्या.

"संपदा!!!" एका वेलीच्या मांडवामागून वीणा मावशी बाहेर आली, "इकडे कशी काय?"

“मावशी, ही तुझी बाग आहे?” संपदाने विचारलं.

“हो”

“हे पोतं इथे कोणी आणलं?” नेहाने पोत्याच्या घडीकडे बोट दाखवत विचारलं.

“ते पोतं..” बोलता बोलता वीणा मावशी थांबली, “अच्छा, तर तुम्ही दोघी आहात माझ्या ‘मिस्टरी लिफ डोनर’. मी विचारच करत होते ह्या मिस्टरी डोनरपर्यंत पोहोचयचं कसं”

संपदा आणि नेहा मिस्किल हसल्या.

“थँक यू!!”.

“थँक यू कशासाठी मावशी?”

“ह्यासाठी. वाफ्यांकडे बघत मावशी म्हणाली. नेहा आणि संपदाने बघितलं. वाफ्यात माती दिसतच नव्हती. सगळ्या वाफ्यात पानांचा थर पसरलेला होता.



दोघी गोंधळल्या. “त्याचा काय उपयोग?” नेहाने विचारलं.

“पानं मातीवर पसरल्यामुळे जमिनीत ओलावा जास्ती वेळ टिकून राहतो. मुळांची वाढ चांगली होते. पाणी कमी द्यावं लागतं त्यामुळे पाण्याचीही बचत होते. पानं कुजली की त्यातली पोषणद्रव्यं आपोआप मातीला मिळतात.

“पानांचा हा थर कुजला की परत पानं घालायची?” संपदाने विचारलं.

“हो” वीणा मावशी म्हणाली.

“म्हणजे तुला पानं सारखीच लागत असतील.”

“नेहमीच. पानांचे आणि स्वयंपाकघरातल्या कचऱ्याचे खत सगळ्या वाफ्यांमध्ये भरले आहे. माती अगदीच कमी आहे. ही सगळी बाग पानांच्या खतावर आणि स्वयंपाकघरातल्या कचऱ्यावरच फुलली आहे.”

“साधारण किती पानं लागतात तुला?” संपदाच्या डोक्यात चक्र सुरू झालं.

“आठवड्याला सात ते आठ पोती.”

“आमच्या आवारात आठवड्याला तीन-चार पोती निघतात.“ संपदा म्हणाली.

“आमच्या शेजारच्या सोसायटीत पानं खूप असतात. तेही जाळून टाकतात. त्यांना पोती देऊन त्यात पानं भरायला सांगितली तर.” नेहा म्हणाली.

“छानच होईल.” वीणा मावशी म्हणाली.

“मावशी, तू काळजी करू नकोस. माझ्या आवारातून आणि नेहाच्या शेजारच्या इमारतीतून आम्ही तुला पोती आणून देत जाऊ”.

“खूप मदत होईल. पानं कोठून आणायची हा प्रश्नच असतो”.

“पण पानं तर भरपूर असतात की मावशी, सध्या जिथे बघू तिथे पानं आहेत, रस्ता, फूटपाथ सगळीकडे” संपदाने विचारलं.

“पानं खूप आहेत ग. पण आपल्याकडे पानं कचरा समजली जातात ना, त्यामुळे पानं पडलेली दिसली की लोक त्यात कचरा टाकतात. तुमची पानं मिळाल्याने किती मदत झाली मला. नाहीतर मी रस्त्याच्या कडेची पानं आणायचे. कचरा वेगळा करण्यात वेळ जातोच आणि किळसही वाटते. वाट्टेल तो कचरा असतो त्यात, अगदी डायपरसुद्धा!!

“ई!!!!”

“लोक थुंकतात सुद्धा त्यात, मी बघितलं आहे.”

“हो ना. रबरी हातमोजे घालूनच करावं लागतं हे काम. तुझी आवारातली पानं होती त्यामुळे त्यात अजिबात कचरा नव्हता. खूप पटापट काम झालं आणि छानही वाटलं.”

“अशी कचरा-विरहित पानं तुला कायम मिळाली तर?“

“खूपच मदत होईल. मीच नाही, आपल्याच गल्लीत एकूण चार गच्चीवरच्या बागा आहेत. आमचा गट आहे, आम्ही रोपांची, बियांची देवाणघेवाण करतो. शेजारच्या गल्लीतले लोकही आहेत त्या गटात. आम्हा सगळ्यांनाच मदत होईल.”

“हे भारी आहे. म्हणजे ‘पानं असणारे’ आणि ‘पानं हवी असणारे’ दोन्ही लोक आपल्या आणि शेजारच्या गल्लीत आहोत. त्यांनी एकमेकांत पानांची देवाण-घेवाण केली तर आपल्या ह्या दोन गल्लीतली पानं जाळणं बंद होईल आणि अशा सुंदर बागा होतील.” संपदा म्हणाली.

“खरंच, फारच सुंदर आहे तुझी बाग मावशी.” नेहा म्हणाली.

दोघी घाईघाईने निघाल्या. “कुठे चाललात?”

“फार काम करायचं आहे मावशी. गल्लीतल्या सगळ्या सोसायटयांमध्ये जाऊन लोकांशी बोलणं सुरू करतो.”

“हो हो, हे तर घेऊन जा”. मावशी म्हणाली.

”आज रिकाम्या पोत्याबरोबर हे मी ठेवणार होते, मिस्टरी डोनरसाठी ‘थँक यू’.”

“थँक यू!” संपदाच्या हातात ताज्या भाज्यांनी भरलेली टोपली देऊन, दोघींच्या डोक्यावर प्रेमाने हात ठेवत वीणा मावशी म्हणाली.




Author: Aditi Deodhar (www.aditideodhar.com)

Founder- Director Jeevitnadi - Living River Foundation (www.jeevitnadi.org)

Founder Brown Leaf Forum (www.brownleaf.org)

Project Lead - Mission City Chakra, Centre for Sustainable Development, Gokhale Institute of Politics and Economics (www.missioncitychakra.com)